## महत्त्वाचे

## अस्तगाव न्यू इंग्लिश स्कूलचा ८९.८४ टक्के निकाल



**राहाता (तालुका प्रतिनिधी)**– रयत शिक्षण संस्थेच्या अस्तगांव येथील न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयाचा दहावीचा निकाल ८९.८४ टक्के तर गुरुकुलचा निकाल १०० टक्के लागला आहे. भाग्यश्री नानासाहेब आष्टेकर या विद्यार्थिनीने ९२ टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम क्रमांक मिळविला तर गितांजली संजय पवार ९१ टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक, श्रेया पाराजी गवांदे ८९.८० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक, श्रावणी राजेंद्र जेजूरकर ८९.२० टक्के गुण मिळवून चतुर्थ क्रमांक तर यशराज गोरक्षनाथ जेजूरकर या विद्यार्थ्याने ८८.८० टक्के गुण मिळवून पाचवा क्रमांक मिळवला. विद्यालयातील १२८ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यातील २२ विद्यार्थी विशेष प्राविण्य मिळवून उत्तीर्ण झाले. श्रेणी एक मध्ये ३९ विद्यार्थी, श्रेणी दोन मध्ये ३० विद्यार्थी तर पास श्रेणीत २४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक जगन्नाथ माळी, पर्यवेक्षक बाबासाहेब गांगर्डे यांचेसह सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. या सर्व विद्यार्थ्यांचे स्थानिक स्कूल कमिटी, शाळा व्यवस्थापन व सल्लागार समिती, पालक शिक्षक समिती, माता-पालक समिती व ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

## पिंपरी निर्मळ येथे बिबट्याच्या हल्ल्यात शेळी ठार

**पिंपरी निर्मळ (वार्ताहर)**– राहाता तालुक्यातील पिंपरी निर्मळ येथे बिबट्याने केलेल्या हल्ल्यात भुसाळ वस्तीवर राहणाऱ्या आबासाहेब भुसाळ यांच्या शेळीला जीव गमवावा लागला.



बिबट्याचे लोकवस्तीत सातत्याने होणारे हल्ले पाहता वनविभागाने तातडीने पिंजरा लावावा, अशी मागणी येथील संदीप भुसाळ यांच्यासह नागरिकांनी केली आहे. पिंपरी निर्मळ येथील भुसाळ वस्तीवरील आबासाहेब भुसाळ यांच्या शेडमध्ये बिबट्याने प्रवेश केला. बिबट्याने रात्री केलेल्या हल्ल्यात त्यांच्या शेळीला जिव गमवावा लागला आहे. त्यामुळे त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. गेल्या दोन चार वर्षापासून गावातील विविध वस्तीवरील शेळ्या, कोंबड्या, पाळीव कुत्रे, कालवडी यांच्यावर वारंवार बिबट्याचे हल्ले होत आहेत. प्रशासनाला वारंवार पाठपुरावा करूनही बिबट्याला बंदिस्त करण्यासाठी पिंजरा मिळत नाही. त्यामुळे नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे. त्यातच गावात कायमच विज पुरवठ्याचा लपंडाव असल्यामुळे वस्तीवरील नागरिकांचे हाल होत आहे. पाळीव पशु व प्राणी यांच्यावर सातत्याने होणाऱ्या हल्ल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. वन विभागाने तातडीने भुसाळ वस्तीसह आवश्यक त्या ठिकाणी बिबट्यांना पकडण्यासाठी पिंजरे लावावेत, अशी मागणी संदीप भुसाळ व ग्रामस्थांनी केली आहे.

## पुरस्काराबद्दल पानगे यांचा सत्कार



**वडाळा बहिरोबा (वार्ताहर)**– अहिल्यानगर येथील रेवणनाथ बन्सी पानगे यांना संत शिरोमणी नरहरी महाराज राज्यस्तरीय सामाजरत्न पुरस्कार अक्कलकोट येथे देण्यात आला. यानिमित्त अहिल्यानगर येथे नुकताच त्यांचा सत्कार करण्यात आला. भिस्तबाग चौक महादेव मंदिर येथे माजी नागरसेविका दीपाली बारस्कर व नितीन बारस्कर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यावेळीं श्री. शेवाळे, श्री. सोनावणे, दादा काळे, डॉ.अनिल उदावंत, श्री. निंबाळकर, श्री. येमूलशुभम डिकोंडा आदी उपस्थित होते.

## अभिनेता प्रमोद पंडित यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर

**हनुमंतगाव (वार्ताहर)**– कलावंत विचार मंच कमल फिल्म फाउंडेशन व कमल म्युझिक मराठी यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा चित्रपट महर्षी दादासाहेब फाळके पुरस्कार अभिनेते दिग्दर्शक प्रमोद पंडित यांना जाहीर झाला आहे.



प्रमोद पंडित हे फिल्म क्षेत्रात नेहमी नवनवीन कलाकारांना आपल्या सिरीयल अथवा चित्रपटात काम मिळवून देतात. त्यांच्या कामाची पावती म्हणून या पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात येत आहे. दादासाहेब फाळके चित्रपट युनियन जिल्हाध्यक्ष प्रमोद पंडित कलाकारांच्या बाजूने कायम उभे असतात. पुरस्कार जाहीर झाल्यानंतर त्यांनी सांगितले, सिनेमा, वेब सिरीज अडचणीत येऊ नये यासाठी नेहमी प्रयत्नशील राहील. काहींनी इन्स्टाचा दुरुपयोग करून चांगल्या प्रेक्षकांना आपल्याकडे वळवले आहे. त्यामुळे चित्रपट अथवा चांगले वेब सिरीज न पाहता लोक अश्लील वेबसाईट, व्हिडिओ, इन्स्टा रिल्सकडे जास्त आकर्षित होत आहे. त्यामुळे वाईट गोष्टींना वाव मिळतो. त्यामुळे गुन्हेगारीचे प्रमाण वाढत चालले आहे. समाजात दोन प्रेक्षक वर्ग तयार झाले आहे. एक म्हणजे चांगल्या कलाकारांना वाव देणारा, दुसरा म्हणजे वाईट कलाकारांना प्रोत्साहन देणारा.नवीन कलाकारांना वेब सिरीजच्या माध्यमातून काम देण्याचा नेहमी प्रयत्न करणार आहे, असे अभिनेते दिग्दर्शक प्रमोद पंडित यांनी सांगितले.

# निळवंडेचे पाणी चिंचोली गुरवमध्ये दाखल

### सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात साखर कारखान्याने केली मोठी मदत

**तळेगाव दिघे (वार्ताहर)**– माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी तळेगावसह दुष्काळी भागा-तील गावागावात पाणी देण्यासाठी कारखान्याच्या माध्यमातून यंत्रणा देऊन पाणी पोहोचवले असून थेट चिंचोली गुरव गावात पाणी आल्याने नागरिकांच्या आनंदाला उधाण आले आहे.



सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याची यंत्रणा व पाईप देऊन विविध गावांसाठी मोठमोठ्या चाऱ्या निर्माण केल्या. यासाठी कारखान्याची यंत्रणा रात्रंदिवस काम करत होती. यामुळे मागील वर्षीपासून देवकौठे, मालढोण, सायाळे या गावांना पाणी मिळत आहे. इतर गावांनीही मागणी केल्यानंतर कारखान्याच्या यंत्रणेने त्यांना मोठी मदत केली. कालव्यापासून चिंचोली गुरव नदीपर्यंत चार किलोमीटरच्या अंतराकरीता मोठी चारी खोदण्यात आली असून दोन बंधारे व तीन नद्या ओलांडून हे पाणी अखेर चिंचोली गावात दाखल झाले आहे. मागील काही वर्षांचे स्वप्न साकार झाल्याने संपूर्ण नागरिकांनी मोठ्या आनंदाने पाण्याचे स्वागत केले आहे.

यावेळी बोलताना संपत गोडगे म्हणाले, धरण व कालवे तर माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनीच पूर्ण केले. ज्यांची आता सत्ता आहे त्यांचे या कामांमध्ये कोणतेही योगदान नाही. नवीन लोकप्रतिनिधीला कालवे आणि गावे सुद्धा माहिती नाही. त्यांचा तर बिलकुल संबंध नाही. सर्वांना पाणी देण्यासाठी माजी मंत्री थोरात कटिबद्ध असून मागील वर्षी मध्य प्रदेशमध्ये कारखान्याच्या यंत्रणेसह जाऊन त्यांनी पाणी वरच्या भागाला देण्याचा पॅटर्न येथे राबवण्याचे निश्चित केले आहे. ते सर्वांना पाणी देणारच आहेत असा विश्वास व्यक्त केला. तर अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर पाणी आल्याचे मोठे समाधान असल्याचे सरपंच विलास सोनवणे म्हणाले.

# श्री क्षेत्र देवगड देवस्थानच्यावतीने दहा गोशाळांना कडबाकुट्टी यंत्रांचे वाटप

**देवगड फाटा (वार्ताहर)**– नेवासा तालुक्यातील श्रीक्षेत्र देवगड गुरूदेव दत्त पीठ संस्थानच्या वतीने सामाजिक संस्थेच्या वतीने सुरू असलेल्या दहा गोशाळांना कडबा कुट्टी यंत्रांचे वाटप महंत भास्करगिरी महाराज यांच्या हस्ते करण्यात आले.

राज्यातील सामाजिक व धार्मिक संस्थानच्या वतीने चालविल्या जाणाऱ्या गोशाळांना कडबा कुट्टी मशीन भेट देण्याचा उपक्रम श्री गुरूदेव दत्त पीठ देवगड संस्थानच्या वतीने भास्करगिरी महाराजांच्या संकल्पनेतून राबवला जातो. यावर्षी दहा गोशाळांना देवगड येथे कडबाकुट्टी मशीनचे वाटप करण्यात आले.



यावेळी भास्करगिरी महाराज म्हणाले, गोरक्षा हे देश रक्षा करण्यासारखे पुण्याचे कार्य आहे. गोमातेची जेवढी सेवा कराल तेवढे फळ आपल्याला मिळते. गो मातेचे पालन, तिचे रक्षण करणे ही काळाची गरज असून यासाठी प्रत्येकाने पुढे यावे, असे आवाहन केले.

यावेळी राशीन (कर्जत) येथील यशोदानंद गोशाळा, परभणी जिल्ह्यातील कोठाळा तांडा, जामखेड धामणगाव येथील श्री संत नंदराम महाराज गोशाळा, कुसळंब बीड येथील खंडेश्वरा गोशाळा, हिवरा रोशनगाव जालना येथील श्रीकृष्ण गोशाळा, उंबर विहरा बीड येथील राधाई गोवंश गोसंवर्धन केंद्र, कर्जत दगडवाडी येथील श्री रुख्मिणी माता गोशाळा, नांदेड घुंगराळा येथील गोवंश सुधार प्रकल्प, बीड कारेगाव येथील कै. नयना तांबे गोशाळा, जामखेड फकराबाद येथील श्री गांगेय गोशाळा या गो-शाळांना कडबा कुट्टी यंत्रे भास्करगिरी महाराज यांच्या हस्ते देण्यात आली

## भोकर शिवारात अपघातात श्रीरामपूरचे सुनिल हंगेकर ठार

**भोकर (वार्ताहर)** – श्रीरामपूर नेवासा रोडवरील भोकर-खोकर शिवारात पिकअप अपघातात श्रीरामपूर येथील संत नामदेव शिंपी समाज पंच मंडळाचे माजी सचिव सुनिल काशिनाथ हंगेकर ठार झाले.



सुनिल हंगेकर हे सकाळी १० वाजेच्या सुमारास श्रीरामपूर-नेवासा राज्य मार्गावर भोकर-खोकर शिवारात रस्त्याच्याकडेला दुचाकी उभी करून लघुशंका करत असतानाच श्रीरामपूरकडून माळवाडगावकडे भरधाव वेगाने चाललेल्या पिक अपने त्यांना जोराची धडक दिली. त्यात ते गंभीर जखमी झाले. हा अपघात घडल्याचे समजताच परीसरातील युवकांनी लागलीच जखमी हंगेकर यांना उपचारासाठी श्रीरामपूर येथील साखर कामगार रूग्णालयात दाखल केले. परंतू उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.

मयत सुनिल हंगेकर यांच्या पश्चात पत्नी, दोन विवाहीत मुली, एक मुलगा, पुतणे, जावई व नातवंडे असा परिवार आहे. या प्रकरणी तालुका पोलिसांत अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस हवालदार नवनाथ बर्डे हे करत आहेत.

## श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पालखीचे २७ मे रोजी श्रीरामपुरात आगमन

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)**– शहरामध्ये श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पालखीचे मंगळवार, दि. २७ मे रोजी दुपारी १२ वाजता आगमन होणार आहे.


सालाबादप्रमाणे २८ व्या वर्षी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट न्यासाच्या वतीने अक्कलकोट निवासी स्वामी समर्थांची पालखी पादुकांचे दर्शन व सेवा महाराष्ट्रातील गावोगावी असलेल्या स्वामी भक्तांना करता यावे, यासाठी श्रीस्वामी समर्थ महाराजांची पालखी परिक्रमेचे आयोजन केले आहे.

दूरवरच्या अबालवृद्धांना महिला, स्वामी भक्तांना श्री दर्शनाची इच्छा असू-नही स्वामींच्या अक्कलकोट निवासी येथे येता येत नाही, अशांना दर्शन देण्यासाठी व सेवा घेण्यासाठी श्री स्वामीच आपल्या गावी श्रीरामपूरला मंगळवार दि. २७ मे रोजी दुप-ारी पालखी पादुकाचे आगमन होणार आहे.

पालखी कोल्हार येथून सुतगिरणी रस्ता, मेनरोड, श्रीराम मंदिर रोडमार्गे येणार असून पंचकोशीतील श्री स्वामी समर्थ भक्तांनी पालखी दर्शन, महाआरती सोहळ्याचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्वामी समर्थ सेवा ट्रस्टचे पदाधिकारी, भक्त, महिला मंडळ, भजनी मंडळ, तरुण मंडळांनी केले आहे.

## अकरावी प्रवेश सुसूत्रतेसाठी अकोले तालुका समितीची बैठक

**अकोले (प्रतिनिधी)** – शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ पासून अकरावी ऑनलाइन केंद्रीय प्रवेश प्रक्रियेमध्ये अधिक सुसूत्रता आणण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने २५ फेब्रुवारी, २०२५ व ६ मे, २०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित केल्याप्रमाणे अंमलबजावणी अकोले तालुक्यात सुरू आहे. यासाठी गटशिक्षणाधिकारी तथा ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया तालुका समितीचे अध्यक्ष अरविंद कुमावत व समितीच्या सचिव विस्तार अधिकारी सविता कचरे, विषय तज्ज्ञ महेश पाडेकर, सदस्य प्राचार्य गणपत धुमाळ, तंत्रस्नेही शिक्षक चंद्रशेखर हासे, अकोले महाविद्यालयाचे






उपप्राचार्य चांगदेव डोंगरे यांच्या प्रमुख उपस्थितीत के. बी. दादा सभागृहात सहविचार सभा संपन्न झाली.

यावेळी तालुक्यातील सर्व प्राचार्य, नोडल शिक्षक, तंत्रस्नेही शिक्षक उपस्थित होते. यावेळी प्रत्यक्ष केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेविषयी सविस्तर माहिती विस्तार अधिकारी सविता कचरे, समिती सदस्य विषयतज्ज्ञ महेश पाडेकर, समिती सदस्य चंद्रशेखर हासे यांनी दिली. विद्यार्थी व पालकांमध्ये संभ्रम निर्माण होऊ नये म्हणून प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयातसमुपदेशनकक्षाची स्थापना करण्यास सांगितले. तसेच प्रवेश प्रक्रिया संदर्भात विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. यामध्ये व्यवस्थापन कोटा, अल्पसंख्यांक कोटा, इन हाऊस कोटा, विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चिती केल्यानंतर करावयाची कार्यवाही, विद्यार्थ्यांनी प्रवेश रद्द केल्यानंतर करावयाची कार्यवाही, कॉलेज निवड करणे, याविषयी सविस्तर मुद्देनिहाय माहिती दिली. विद्यार्थ्यांपर्यंत गुणवत्तेनुसारच प्रवेश प्रक्रिया होईल, विद्यार्थी व पालक यांच्या सर्व समस्या जाणून घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. ही ऑनलाईन केंद्रीय प्रवेश प्रक्रिया सर्वांसाठी नवीन आहे. यासाठी समुपदेशन कक्षाच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्याच्या सूचना अरविंद कुमावत यांनी दिल्या. सूत्रसंचालन महेश पाडेकर यांनी केले.

# रांजणगाव देशमुख-जवळके रस्त्याची साडेसाती संपणार कधी?

### संबंधित विभागाचे पूर्णता दुर्लक्ष, सातत्याने होतात अपघात

**रांजणगाव देशमुख (वार्ताहर)**– गेल्या अनेक वर्षापासून कोपरगाव तालुक्यातील रांजणगाव देशमुख-जवळके या रस्त्याची अतिशय दुरावस्था झालेली आहे. हा सहा किलोमीटर अंतराचा रस्ता पुर्णता उखडलेला आहे. वाहनधारकांना खड्ड्यांचा सामना करुनच प्रवास करावा लागतो. खराब रस्त्यामुळे या रस्त्यावर सातत्याने अपघात होत आहेत. या रस्त्याची साडेसाती कधी संपणार याकडे वाहनधारकांचे लक्ष लागून आहे.



जवळके ते रांजणगाव देशमुख हा रस्ता वाहतुकीच्या लायक राहीला नाही. उखडलेल्या ठिकाणी साधी मलमपट्टी सुध्दा करण्याची तसदी संबंधित विभाग घेत नाही. दररोज मरणयातना सहन करुनच या रस्त्यावरुन प्रवास करावा लागतो. हा रस्ता कधी दुरुस्त होणार याकडे परिसराचे लक्ष लागुन आहे. रस्ता तातडीने दुरुस्त केला नाही तर लवकरच आंदोलन छेडण्याचा इशारा परीसरातील नागरिकांनी दिला आहे.

झगडे फाटा-रांजणगाव रस्ता मध्यंतरी जवळके पर्यंत करण्यात आला. मात्र सुमार दर्जाच्या कामामुळे हा रस्ता पुढे काम सुरु होते मागे रस्ता उखडत होता. झगडे-फाटा ते जवळके रस्त्यावर खड्डे बुजविण्यात आले पण ते परत उखडण्यास सुरुवात झाली आहे. या रस्त्याकडे सर्वांचेच दुर्लक्ष आहे. संबंधित विभाग तर झोपेचे सोंग घेतल्यागत आहे. त्यांना या रस्त्याचे काहीच देणेघेणे नाही. अनेक वेळेस खराब रस्त्याच्या बाबतीत तक्रारी करण्यात आल्या. रस्तावर भाकरी भाजण्यात आल्या पण त्यांच्यावर कसलाच परिणाम होत नाही. आमचे कोणीच काही करु शकत नाही या अविर्भावात हा विभाग आहे. त्यांनी या परिसरातील लोकांचा संयम बघितलेला असेल पण प्रसंगी त्यांचा उद्रेक बघितलेला नाही. आता परिसरातील लोकांचा संयम संपल्याचे चित्र आहे.



## राहुरी फॅक्टरी येथे तीन दुकाने आगीत खाक

**देवळाली प्रवरा (वार्ताहर)**– राहुरी फॅक्टरी येथील प्रसादनगर भागातील किराणा दुकान, ब्युटी पार्लर व कपड्याचे दुकान ही तिन्ही दुकाने शॉर्टसर्किटमुळे लागल्या आगी भक्ष्यस्यानी पडली. अचानक लागलेल्या आगीमुळे तीनही दुकानांचे मोठे नुकसान झाले आहे.

शनिवार दि. २४ मे रोजी दुपारी सुमारे एक ते दिड वाजण्याच्या सुमारास घडली. राहुरी फॅक्टरी येथील प्रसादनगर भागात नितीन पुंड यांचे किराणा दुकान, प्रीती साळवे यांचे ब्युटी पार्लरचे दुकान व सारिका कांगळे यांचे कपड्याचे दुकान आहे. दुपारच्या दरम्यान अचानक नितीन पुंड यांच्या किराणा दुकानाला शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याने या आगीने मोठा पेट घेतला. शेजारीच असलेल्या ब्युटी पार्लर व कपड्याच्या दुकानालाही आगीने विळखा घालतल्याने मोठ्याप्रमाणात आगीने उग्र रुप धारण केले. बघता बघता क्षणात होत्याचे नव्हते झाले. दुकानातील सर्व माल आगीत जळून खाक झाला. आग आटोक्यात आणण्यासाठी देवळाली प्रवरा नगरपालिकेच्या अग्निशामक दलास पाचारण करण्यात आले. अग्नीनिशामक दलाच्या प्रयत्ना नंतर ही आग आटोक्यात आली. तोपर्यंत उशीर झाला होता. आगीत तीनही दुकानांचे मोठे नुकसान झाले. आग विझवण्यासाठी देवळाली प्रवरा नगरपालिका अग्निशामक विभाग व परिसरातील नागरिकांनी प्रयत्न केले. यावेळी बघ्यांची मोठी गर्दी घटनास्थळी झाली होती. त्यामुळे कामात अडथळा निर्माण होत होता.